॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २४ ( ) पीएच.डी. मध्ये अधिक सुसुत्रता येण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने सुधारीत मार्गदर्शक नियमावली तयार केली असून या मसुद्याला विद्या परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि.२४ जुलै रोजी विद्या परिषदेची बैठक झाली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात येवून मान्यता देण्यात आली. पीएच.डी. मध्ये अधिक सुसुत्रता येण्यासाठी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्या अध्यक्षतेखाली यापूर्वी समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या अहवालावर विद्या परिषदेच्या बैठकीत चर्चा झाली आणि समितीने सुचविलेल्या सुधारीत मसुद्याला मान्यता देण्यात आली. त्यानुसार आता एखादया संशोधक विद्यार्थ्यांने सलग दोन सहामाही प्रगती अहवाल जमा केले नसतील तर त्याला पत्र देण्यात येईल. त्यानंतरही संबंधित विद्यार्थ्याने सलग तीन सहामाही प्रगती अहवाल जमा केले नाहीत तर विद्यार्थ्याच्या मार्गदर्शकाला पत्र देवून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येईल. त्यानंतर संबंधित विद्यार्थ्याचा पीएच.डी साठीचा प्रवेश प्र-कुलगुरुंच्या मान्यतेने रद्द करण्यात येईल. एखादया संशोधक विद्यार्थ्याच्या संशोधनाच्या संक्षिप्त रुपरेषेमध्ये आरआरसी समितीने दुरुस्ती सुचविल्यानंतर विद्यार्थ्याने दुरुस्त केलेली संक्षिप्त रुपरेषा पुन्हा आरआरसीच्या सभेत मंजूरीसाठी ठेवण्याची आवश्यकता नाही. त्या-त्या विद्याशाखेच्या अधिष्ठात्यांना संशोधन विभागाकडून दाखविण्यात येईल व त्यांची मंजूरी घेण्यात येईल. विद्यार्थ्याला ज्या तारखेला मार्गदर्शक देण्यात आला आहे तीच तारीख पीएच.डी नोंदणीची तारीख असेल. अशा जवळपास वीस मुद्यांचा समावेश या नव्या मसुद्यात करण्यात आला आहे.

सध्या विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पीएच.डी प्रवेश परीक्षेतून सूट दिली जाते तशीच सूट विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देण्याचाही प्रस्ताव आज मान्य करण्यात आला. आजच्या बैठकीत चॉईस बसेड क्रेडिट सिस्टीमवर चर्चा झाली. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी.प्रथम वर्षासाठी या शैक्षणिक पासून ही प्रणाली लागू केली जाणार असून त्या अभ्यासमंडळांनी प्रथम वर्षाचे या प्रणालीनुसार तयार केलेले अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर टाकण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली. या विषयावर बोलताना कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी चॉईस बेसड् क्रेडिट सिस्टीमबाबत जिल्हावार प्राध्यापकांच्या कार्यशाळा घेतल्या जातील. कोणत्याही प्राध्यापकांचा वर्कलोड कमी होणार नाही याची काळजी घेतली जाईल अशी माहिती दिली.

आजच्या बैठकीत विद्यापीठाचे सर्व निकाल निर्धारित कालावधीच्या आत व चांगले लागल्याबद्दल तसचे विद्यापीठाच्या सर्व प्राधिकरणाच्या निवडणूका इतर विद्यापीठांच्या आधी शांततेत व पारदर्शीपणे पार पडल्याबद्दल कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव, परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक आणि प्रशासनाचे अभिनंदन करणारा ठराव प्राचार्य एस.आर.जाधव यांनी मांडला. या ठरावाला प्राचार्य प्रमोद पवार यांनी अनुमोदन दिले. विद्या परिषदेने हा ठराव एकमताने मान्य केला. कुलसचिव भ.भा.पाटील यांनी बैठकीच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.

---

जा.क्र: उमवि/१६/ हस्तदेय /२०१८ — दिनांक : २० जुलै, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी